विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव गोवा

द्वितीय सत्र परीक्षा - March 2024

इयत्ता अकरावी

दिनांक : 22/03/2024 वेळ : ३ तास

विषय : मराठी गुण: ८०

*****************************************************************************************************

सूचना : १. शुध्दलेखनाचे नवीन नियम पाळावेत.
२. उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

विभाग १ - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा.

प्रश्न. 1. महाग (1)

प्रश्न. 2. सुंदर (1)

प्रश्न 3. गोड (1)

खालील शब्दांची विशेषणे लिहा.

प्रश्न. 4. वादळ (1)

प्रश्न. 5. हौस (1)

प्रश्न. 6. स्वभाव (1)

खालील शब्दांचे विरुध्दार्थी शब्द लिहा.

प्रश्न. 7. ज्ञान (1)

प्रश्न. 8. लहान (1)

प्रश्न. 9. चांगला (1)

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा.

प्रश्न. 10. गाय (1)

प्रश्न 11. मोर (1)

प्रश्न. 12. स्त्री (1)

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा.

प्रश्न. 13. पुस्तक (1)

प्रश्न. 14. गाडी (1)

प्रश्न. 15. काठी (1)

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा.

प्रश्न. 16. मी डोक्यावर हात घेऊन स्वस्त बसले होते आणि ते पोळी भाजीचा डबा घेऊन बाहेर पडले. (4)

## विभाग २- गद्य

**खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

प्रश्न. 17. बाबली , कालू, राणी आणि नेली ही कोणत्या प्राण्यांची नावे ठेवण्यात आली होती? (1)

प्रश्न. 18. अप्पा आणि कावेरी कुठे जाण्याची स्वप्ने रंगवतात ? (1)

प्रश्न. 19. जर मी रणांगणात पडलो धारातीर्थी तर आपले शव पेटीत घालून घरी पाठवताना काय करण्यास सैनिक सांगतात ? (1)

**खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.**

प्रश्न.20. डॉ. मंदा आणि दादा पांचाळ, विलास मनोहर, गोपाळ फडणीस असे सहकारी ____________ (1)

अ. एवढेच लोक सुरुवातीला इथे राहत होते.

आ. हे सर्व लोक येथून निघून गेले होते.

इ. या सर्व लोकांना इथे राहायला यायचे होते.

प्रश्न. 21. मुलीचा गैरसमज झाला आणि____________________ (1)

अ. पाकीटात दागिने सापडले.

आ. दागिने कपाटातच सापडले.

इ. पाकीट कपाटातच सापडले.

प्रश्न. 22. माझे कर्तव्य पूर्ण होण्याआधी जर मृत्यूने माझ्यावर घाला घातला तर______________ (1)

अ. मी आधीच पळ काढीन

आ. मी आधी मृत्यूलाच ठार मारेन

इ. मी मोहीम सोडून जाणार

**खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.**

प्रश्न. 23. "आपण फक्त जिने असतो. फक्त जिने.!" (5)

**किंवा**

"देखते हैं कौन उपर राहेगा और कौन नीचे..!"

**खालील प्रश्नाचे उत्तर ७ ते ८ ओळीत लिहा.**

प्रश्न. 24. आप्पासाहेब व कावेरी यांना लोक चोरवाडीला नेऊन पोहोचवतील, असे विठोबा का म्हणतात? (5)

**किंवा**

योगेंद्रसिंग यादवांच्या असामान्य पराक्रमाचे वर्णन लेखिकेने कसे केले आहे.?

## विभाग ३ - पद्य

**खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

प्रश्न.25. 'शहरातला गाव' या कवितेचे कवी कोण आहे.? (1)

प्रश्न. 26. 'स्वैर भटकावे' या कवितेच्या शिर्षकाचा अर्थ काय .? (1)

प्रश्न. 27. शहरातल्या भिंती खायला येतात तेव्हा कविला कशाची आठवण येते.? (1)

**खाली दिलेली कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.**

प्रश्न . 28. रस्त्यातल्या ट्रॅफिकने धडकतो उर गाव देतो नदीच्या वहाणा चल म्हणतो______ (1)

प्रश्न. 29. डोळे भरून पाहावे धुंद हिरवे वैभव खुळ्या पाटाच्या पाण्याशी ______ (1)

प्रश्न. 30. तो फक्त ओढतो शाल नभाची तरीही त्या श्याम निळ्याच्या______ (1)

(पिटकुळीचे लाघव, तिला पाहती पाण्यात, मोरपिसांपरी दिसतो, दर्यापर्यंत दूर )

**खालील कवितेतील ओळीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.**

प्रश्न. 31. "मी डाव रडीचा खात जिंकतो अंती (5)

तो स्वच्छ मोकळ्या मुक्त मनाने हरतो"

किंवा

"गाव हळूच मारतो फुंकर

जात्यावरच्या ओवींची"

**खालील प्रश्नांची उत्तरे ७ ते ८ ओळीत लिहा**

प्रश्न. 32. शहरी जीवनाला कंटाळलेल्या मानला, गावाची लागलेली ओढ या कवितेत कशी व्यक्त झाली आहे.? (5)

किंवा

कवी शंकर रामाणी यांनी कुळागराचे वर्णन कसे केले आहे?

**खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य पर्याय निवडून लिहा.**

प्रश्न 33. हातभार लावणे (1)

अ. गोंधळून जाणे

आ. मदत करणे

इ. कामाचा हिशोब घेणे

ई. लाचार होणे

प्रश्न. 34. भांबावून जाणे (1)

अ. उतावीळ होणे

आ. त्रास होणे

इ. गोंधळून जाणे

ई. आनंद होणे

प्रश्न. 35. कदर नसणे (1)

अ. कदर करणे

आ. किंमत नसणे

इ. माहिती असणे

ई. खराब करणे

प्रश्न 36 झुंज देणे (1)

अ. आळस देणे

आ. लढा देणे

इ. झोप घेणे

इ. स्वस्त बसणे

## विभाग ४ - लेखन

**खालील उतारा वाचून त्याच्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

भारतीय राज्यघटनेद्वारे आपल्या देशात लोकशाही आली. पण लोकशाहीची मधुर फळे आपण चाखतो काय? कोणीही विचारी माणूस याचे उत्तर नकारार्थीच देईल. नुसत्या नकाराने हा प्रश्न सुटणार नाही. त्याच्या मुळाशी असणाऱ्या कारणांचा विचार करावयास हवा. वर्णव्यवस्थेच्या जाचक रुढींनी सर्व समाज पोखरला गेला आहे. यामुळे परस्परांबद्दल आपुलकी उरली नाही. अस्पृश्यतेची विषारी मुळे समाजाच्या जमिनीत खोलवर रुजली आहेत. याबद्दल सभा-संमेलन गाजतात. पण व्यावहारिक आचरण मात्र शुन्य. आजही अशी अनेक खेडी आहेत की जेथवर ही शिक्षणाची गंगा अद्यापही पोचली नाही. ती जगापासून कितीतरी दूर आहेत. अज्ञान आणि दारिद्र्य यांच्या विळख्यात जखडलेली आहेत. मी म्हणतो की लोकशाहीच्या यशासाठी समतेचा ध्वज उंच धरा. शिक्षणाचा सर्वदूर प्रसार करा. स्वार्थी धर्मकल्पनांचे जोखड झुगारून द्या. त्यागासाठी सिद्ध रहा विवेकबुद्धी जागृत ठेवा.

37. लोकांमध्ये परस्परांबद्दल आपुलकी का उरली नाही? (1)

38. लोकशाहीच्या यशासाठी काय केले पाहिजे? (2)

39. आज खेड्यांची अवस्था कशी आहे? (2)

**40. मडगांव शहरातील विद्याप्रवर्तक उच्च माध्यमिक विद्यालय, वनमहोत्सव साजरा झाला त्याचा वृत्तांत 11 ते 12 ओळींत लिहा.** (5)

**41. 'राज्यात महिला व मुलींवर होणारे अत्याचार' या विषयावर दोन मैत्रिणी/मित्रांमधील संवाद सुमारे 10 ते 12 ओळींत लिहा.** (5)

42. **खालील पैकी कोणत्याही एका विषयावर २५ ओळींचा निबंध लिहा.** (10)

वाढत्या महागाईचा सामान्य लोकांच्या खिशाला फटका

**किंवा**

माझा आवडता साहित्यिक

**किंवा**

आजच्या पिढीवर मोबाईलचे परिणाम

**किंवा**

रस्त्यावर वाढणारे अपघात

**********************************************************************************